# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/४६ फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

E-mail : ronagpur.dte@gmail.com Website : www.rdtenagpur.org.in


**अतिमहत्वाचे**

क्रः–तंशिस/प्राकाना/शैवि/संकिर्ण/२०११/3071
दिनांक :– 25 NOV 2011

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित
अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट व वास्तुशास्त्र पदवी व पदविका संस्था,
सर्व एम.बी.ए., एस.सी.ए. संस्था
नागपूर विभाग, नागपूर

विषयः– **१०० कोटी वृक्ष लागवडीचे उदिष्ट साध्य करण्याबाबत**

संदर्भः– १. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. मगरीरग्रारोहयो/अ.का–१/कावि २७२९/२०११, दि. ०४/११/११

२. महसूल व वने विभाग शासन परिपत्रक क्र. एफडी एम–२०११/प्र.क्र. १०४/फ–२, दि. २५/११/२०११

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय विकास परिषदेत, महाराष्ट्र राज्य सन २०१२–१७ चे पंचवार्षिक मध्ये ५०० कोटी वृक्ष लागवड करणार असल्याचे जाहिर केले आहे. त्याअनुषंगाने संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांनी आपल्या विभागाकरीता एकुण ५०,००० वृक्ष लागवडीचे उटिष्ट ठरवून दिले आहे.

त्यानुसार आपल्या संस्थेमार्फत कमीत कमी ५०० वृक्ष लागवड करुन त्याबाबतचा अहवाल योग्य त्या पुराव्यासह या कार्यालयास सादर करावा.

सहपत्रः– **वरील संदर्भिय पत्र क्र. १ व २**

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

प्रतः– प्रोग्रामर, यांना सदर पत्र व शासन निर्णय वेबसाईलवर अपलोड करण्याकरीता

The Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act 2005
Ministry of Rural Development
Government of India

मग्रारोहयो क्र.रोहयो/अका.१ /कावि. २७५३/२०११,
जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय, नागपूर.
दिनांक :- २१/११/२०११

प्रति,

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभाग नागपूर
सदर महाराष्ट्र शासन

९६)

**विषय :- १०० कोटी वृक्षलागवडीचे उद्दीष्ट साध्य करणे.**
**संदर्भ :- म. शा. परिपत्रक क्र. एफडीएम-२०११/प्र.क्र.१०४/फ-२, दिनांक २५ ऑक्टोबर २०११.**

संदर्भिय शासन निर्णयाची प्रत यापुर्वीच आपणास पाठविण्यात आलेली आहे. मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५/१०/२०११ रोजी झालेल्या बैठकितील कार्यवृत्तात नमुद नुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०१२ चे हंगामात राज्यात १०० कोटी वृक्ष लागवडीचे निर्देश आहेत. त्यानुसार नागपूर जिल्हयाचे उद्दिष्ट २,८०,९०००० वृक्ष लागवडीचे ठरविलेले आहे. शासनाच्या सुचनेनुसार वनविभाग, सामाजिक वनीकरण विभाग, वनविकास महामंडळ यांनी रोप निर्मीतीचे कामास आतापासूनच सुरूवात करावी. त्याच बरोबर कृषि/फलोत्पादन व तत्सम रोप निर्मीतीची कामे सुरू करण्याबाबत सुचित केले आहे. यामध्ये जिल्हयातील विविध विभागातील अंमलबजावणी अधिकारी निश्चित केलेले आहे त्यांना खालील प्रमाणे वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात येत आहे.

| अ.क्र. | यंत्रणेचे नांव | देण्यात आलेले उद्दिष्ट |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर | १५५२०००० |
| २ | उपवनसंरक्षक, नागपूर | ५० लक्ष |
| ३ | उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नागपूर | १० लक्ष |
| ४ | व्यवस्थापकीय संचालक, वनविकास महामंडळ, नागपूर | २० लक्ष |
| ५ | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर | १० लक्ष |
| ६ | अधिक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, नागपूर | २० लक्ष |
| ७ | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, नागपूर | ५ लक्ष |
| ८ | नगरपरिषद (एकूण १०) प्रत्येकी १०००० | १ लक्ष |
| ९ | महानगर पालीका, नागपूर | ०.५० लक्ष |
| १० | जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर | ५ लक्ष |
| ११ | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, नागपूर | ५ लक्ष |
| १२ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नागपूर | १ लक्ष |
| १३ | प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग, नागपूर | २ लक्ष |
| १४ | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कं., नागपूर (ग्रा.) | ०.१० लक्ष |
| १५ | मुख्य अभियंता, औष्णीक विद्युत केंद्र, कोराडी. | २ लक्ष |
| १६ | मुख्य अभियंता, औष्णीक विद्युत केंद्र, खापरखेडा | २ लक्ष |
| १७ | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभाग, नागपूर | ०.५० लक्ष |
| १८ | सहसंचालक, उच्चशिक्षण विभाग, नागपूर | ०.५० लक्ष |
| १९ | मा. पोलीस आयुक्त, नागपूर | ०.५० लक्ष |
| २० | पोलीस अधिक्षक, नागपूर (ग्रा.) | १ लक्ष |

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक ...8425...
दिनांक ---23-NOV-2011---

| | | |
|---|---|---|
| २१ | पोलीस अधिक्षक, केंद्रीय राखीव बळ, हिंगणा रोड, वानाडोंगरी, नागपूर. | ०.५० लक्ष |
| २२ | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर. | १ लक्ष |
| २३ | कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर | ०.५० लक्ष |
| २४ | कुलसचिव, महाराष्ट्र पशु वैद्यकीय व मत्स्य व्यवसाय विज्ञान विद्यापीठ, नागपूर | ०.५० लक्ष |
| २५ | कुलसचिव, कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर | ०.१० लक्ष |
| २६ | अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, डॉ. पं. दे. कृषि विद्यापीठ, नागपूर | ०.२० लक्ष |
| २७ | नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर | ०.२० लक्ष |
| २८ | जिल्हा मत्स्य व्यवसाय अधिकारी, नागपूर | ०.०१ लक्ष |
| २९ | वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, नागपूर | ०.१० लक्ष |
| ३० | जिल्हा दुग्धशाळा अधिकारी, नागपूर | ०.०५ लक्ष |
| ३१ | प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर | ०.१० लक्ष |
| ३२ | केंद्रप्रमुख दुरदर्शन केंद्र, सेमिनरी हिल, नागपूर | ०.०१ लक्ष |
| ३३ | प्रकल्प अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकारण, नागपूर | १ लक्ष |
| ३४ | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, नागपूर | ०.२५लक्ष |
| ३५ | विभागीय व्यवस्थापक, म. लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर | १ लक्ष |
| ३६ | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर | १ लक्ष |
| ३७ | प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषि औद्योगीक विकास महामंडळ, नागपूर | १ लक्ष |
| ३८ | जिल्हा नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नागपूर | ०.१० लक्ष |
| ३९ | जिल्हा समादेशक होमगार्ड, कॉग्रेस नगर, अजनी, नागपूर | ०.१० लक्ष |
| ४० | खनिकर्म अधिकारी, जि. का., नागपूर (प्रत्येक स्थायी पटयामागे १००० वृक्ष लागवड) | ३.१७ लक्ष |
| | एकूण | ३,०२,१९,००० |

मा. प्रधान सचिव, वने; प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य संरक्षक यांनी सदर योजने अंतर्गत रोपवाटीकेची अंदाजपत्रके तात्काळ तयार करून प्रशासकिय मान्यता देण्याबाबत निर्देश आहेत.

खंडविकास अधिकारी व तहसिलदार यांनी उद्दिष्ट पुर्तीकडे स्वतः लक्ष द्यावे. ग्रामपंचायतीचे क्षेत्रा अंतर्गत देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता वनविभागासह तहसिलदारांनी तालुक्यातील इतर सर्व विभाग व कार्यालय प्रमुखांचा सहभाग घ्यावा.

सबब, जिल्हयांत रोपवाटीका तयार करणे व वृक्ष लागवड करणे याबाबत शासनाकडून देण्यात आलेल्या सुचनांचे तंतोतंत अनुपालन होईल याची सर्व संबंधितांनी खबरदारी घ्यावी.

**(मुळ प्रत मा. जिल्हाधिकारी द्वारा अनुमोदीत)**

जिल्हाधिकारी,
नागपूर

प्रतिलिपी :-

**१) मा. विभागीय आयुक्त (रोहयो शाखा), नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीकरिता सादर.**

**२) उपविभागीय अधिकारी (सर्व) नागपूर/उमरेड/रामटेक/सावनेर/काटोल यांना माहिती व योग्य कार्यवाहीकरीता.**

**३) तहसीलदार (सर्व) उमरेड/भिवापूर/कुही/रामटेक/मौदा/पारशिवनी/काटोल/नरखेड/सावनेर/कळमेश्वर/नागपूर (ग्रा.) / हिंगणा / कामठी यांना माहिती व योग्य कार्यवाहीकरीता अग्रेषीत.**

**४) खंड विकास अधिकारी (सर्व) उमरेड/भिवापूर/कुही/रामटेक/मौदा/पारशिवनी/काटोल/नरखेड/सावनेर/कळमेश्वर/नागपूर (ग्रा.) / हिंगणा / कामठी यांना माहिती व योग्य कार्यवाहीकरीता अग्रेषीत.**

जिल्हाधिकारी,
नागपूर

<u>१०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट साध्य करणे.</u>

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक एफडीएम-२०११/प्र.क्र.१०४/फ-२

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक - २५ ऑक्टोबर,२०११.

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय विकास परिषदेत, महाराष्ट्र राज्य सन २०१२-१७ चे पंचवार्षिक मध्ये ५०० कोटी वृक्ष लागवड करणार असल्याचे जाहीर केलेले आहे. हे उद्दिष्ट शासनाच्या विभिन्न विभाग, कृषी विभाग, वन विभाग, जलसंधारण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्रामीण विकास विभाग, उद्योग विभाग, जलसंपदा विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग आणि खाजगी उद्योजक, शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था व स्वयंसेवी संस्था यांच्या सहाय्याने संयुक्तपणे राबविण्याचे आहे. याकरिता सविस्तर सूचना, विभागनिहाय उद्दिष्ट, रोपांचे नियोजन, वृक्ष लागवडीचे नियंत्रण याविषयीच्या मासिक प्रगतीचा आढावा, जिल्हा / विभागीय / राज्य स्तरावर समन्वय करण्याच्या कार्यपध्दतीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

**<u>वन विभाग.</u>**

वन विभागाकडे १६ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. १६ कोटींचे वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे कार्यक्रम निहाय अंमलात आणण्यात येणार आहे.

| योजनेचे नांव | रोपवन क्षेत्र (हेक्टर) | नैसर्गिक पुनर्निमिती क्षेत्र (हेक्टर) | निधी (रुपये कोटीत) | एकूण क्षेत्र (हेक्टर) | रोपांची संख्या (कोटीत) |
|---|---|---|---|---|---|
| योजना | ८३०० | ४०००० | ९.६८ | ४८३०० | ०.८३ |
| योजनेतर | ३००० | ४०००० | ९.६८ | ४३००० | ०.३० |
| १३ वा वित्त आयोग | ३३०० | ५००० | १.५० | ८३०० | ०.३३ |
| राज्य वन विकास यंत्रणा | ३९०० | ५००० | ६.०० | ८९०० | ०.४९ |
| कॅम्पा | १०००० | ०० | ०० | १०००० | १.०० |
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम | ४३५०० | ६०००० | ७२.०० | १०३५०० | ७.०५ |
| त्रिपक्षीय करार | २५००० | -- | -- | -- | -- |
| इतर | ३००० | ०० | ०० | ३००० | ५.७० |
| **एकूण** | १००००० | १५०००० | ९८.८६ | २२५००० | १५.७ |

.....२/-

सदर उद्दिष्ट परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आले असून, त्याचे वाटप वनवृत्तनिहाय मुख्य वनसंरक्षक यांना वितरीत करण्यात आलेले आहे. मुख्य सचिव त्याबाबतचा आढावा दर महिन्याला व्हिडीओ कॉन्फरन्समार्फत घेणार आहेत.

वन विभागाला हे उद्दिष्ट गाठण्याकरिता आदिवासी उपयोजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम यामध्ये धोरणात्मक व वित्तीय सुधारणा करण्यात येत आहे.

वृक्ष लागवडीकरिता करावयाची रोपांची उपलब्धता.

वनवृत्तनिहाय आढावा घेतला असल्यास, १०० कोटी रोपे उपलब्ध नाहीत, असे स्पष्ट चित्र दिसून येते. पुरेशी रोपे उपलब्ध करुन देण्याकरिता पुढीलप्रमाणे दोन उपाययोजना हाती घेण्यात येतील.

(i) परिशिष्ट-३ मध्ये जोडलेल्या किसान रोपवाटिकांच्या धर्तीवर मोठ्या प्रमाणावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम आणि आदिवासी उपयोजनांमधून जिल्हानिहाय किसान रोपवाटिका घेण्यात याव्यात.

(ii) महाराष्ट्र वन विकास महामंडळ ७० लक्ष अतिरिक्त रोपे स्वत:चे वनीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करुन इतर विभागांना देण्याचे मान्य केलेले आहे. ७० लक्ष रोपे निर्मितीसाठी महाराष्ट्र वन विकास महामंडळाला लागणारा दर व कार्यपध्दती परिशिष्ट-४ मध्ये जोडलेल्या शासन निर्णयाप्रमाणे आहे. शासनाच्या सर्व विभागांनी त्यांना लागणाऱ्या रोपांची मागणी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर यांच्याकडे दिनांक ३० नोव्हेंबर,२०११ पर्यंत नोंदवावी.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, छत्तीसगड या शेजारच्या राज्यांकडून रोपांचा तुटवडा भरुन काढण्याकरिता त्या राज्यांना भेटी देवून तेथील रोपे, दर, कार्यपध्दती यांचा सविस्तर प्रस्ताव एक महिन्यात देतील व त्याप्रमाणे वेगवेगळे विभाग आणि वन विभाग रोपे मागणी पूर्ततेसंदर्भात आवश्यक कार्यवाही आयोजित केली जाईल.

सामाजिक वनीकरण विभाग.

सामाजिक वनीकरण विभाग राज्य पातळीवर सन २०१२-१३ मध्ये ४ कोटी रोपे आणि सन २०१३-१४ मध्ये ६ कोटी रोपांचा पुरवठा करणार आहे. प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण यांना याबाबतीत दिलेले उद्दिष्ट परिशिष्ट-५ मध्ये दिलेले आहे. वन विभाग, ग्राम विकास विभाग, कृषी विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग यांनी त्वरित आवश्यक असणाऱ्या रोपांची मागणी संबंधित प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण यांच्याकडे करावी. यामध्ये ३० टक्के आगावू रक्कम उप-संचालक, सामाजिक वनीकरण यांच्याकडे वर्ग केल्यास, रोपांची मागणी पक्की केली जाईल.

.....३/-

आवश्यक रोपांची मागणी 16.11.2011 पर्यंत

सामाजिक वनीकरण विभागाचे वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट.

सन २०११-१२ मध्ये २ कोटी वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आले असून, सन २०११-१२ मध्ये ४ कोटी वृक्ष लागवड नियोजित आहे. सदर उद्दिष्ट पूर्णपणे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमाखाली पूर्ण करण्यात येईल. यासंबंधातील जिल्हा रोजगार हमी योजनांचा जिल्हा आराखड्यात अंतर्भाव केला जाईल. या सर्व कामांची कोणत्याही परिस्थितीत नोव्हेंबर-डिसेंबर,२०११ मध्ये प्रशासकीय मान्यता घेवून, कामे सुरु करावीत.

कृषी विभाग

कृषी विभागाची जी जमीन पडिक आहे किंवा शेतीच्या बांधावर वृक्षलागवड करणे, ही प्रामुख्याने कृषी विभागाची जबाबदारी असेल. सदर लागवड करीत असताना कृषी विभागाकडे असलेल्या सर्व योजना व परिशिष्ट-७ मध्ये जोडलेल्या खाजगी जमिनीवर फलोत्पादन व वृक्ष लागवडीसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम रोजगार हमी योजना निगडीत फळबाग लागवड योजनेप्रमाणे शिथील करण्यात येईल.

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी व अर्थसंकल्प यांच्या माहितीप्रमाणे कृषी विभागाकडे १७.२० लाख पडिक जमीन असून, त्यावर प्रति हेक्टर १०० वृक्षांची लागवड केल्यास, १७.२० कोटी वृक्ष लागवड होवू शकेल. त्याचप्रमाणे १७४.४२ कोटी हेक्टर बांधांवर प्रति हेक्टर २० झाडे लावल्यास, ३४.८४ कोटी वृक्ष लागवडीस वाव आहे. कृषी विभागामार्फत शेती, बांधावरील वृक्ष लागवडीकरिता वेगळा शासन निर्णय जलसंधारण विभाग दिनांक १५ नोव्हेंबर,२०११ पर्यंत निर्गमित करणार आहे. तसेच पडिक जमिनीवर गट लागवड करण्याकरिता रोजगार हमी योजनेमधून स्वतंत्र शासन निर्णय विचारधीन आहे. या पडिक जमिनीचा विचार करीत असतांना, आदिवासी समाजाला वन हक्क कायदा,२००६ मध्ये जवळपास १ लाख ५१ हजार एकर मिळालेल्या जमिनीपैकी नापिक जमिनीचा प्रामुख्याने विचार करता येईल. त्या जमिनीत साग, बांबू रोजगार हमी योजनेखाली लागवड करण्यासाठी विचार करता येईल.

कृषी विभागाकडे असलेले कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व जिल्हा कृषी अधिक्षक यांनी या कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. विभागवार विभागीय कृषी सह-संचालक यांना देण्यात आलेले उद्दिष्ट परिशिष्ट-८ मध्ये कृषी विभागाकरिता देण्यात आलेले आहे. या उद्दिष्टांमध्ये कृषी विभागाला रोजगार हमी योजनेमधून करावयाच्या फलोत्पादन लागवड व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमामध्ये करावयाची लागवड समाविष्ट आहे.

२७,९२० ग्राम पंचायती असून, प्रत्येक ग्राम पंचायतीला २० हजार वृक्ष लागवड करावयाचे उद्दिष्ट आहे. ही २० हजार झाडे ग्राम पंचायतीकडे उपलब्ध असलेला विकास निधी व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम यामधून करावयाची आहेत. याकरिता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम यांनी वेगळा शासन निर्णय परिशिष्ट-९ मध्ये जोडलेला आहे. हे उद्दिष्ट गाठण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेवर जिल्हानिहाय ठरविलेले उद्दिष्ट परिशिष्ट- मध्ये सोबत जोडलेले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी दर महिन्याला मुख्य सचिव व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे प्रगतीचा आढावा घेतील. ग्राम पंचायतीजवळ असलेल्या रोपवाटिका, महाराष्ट्र वन

.....४/-

विकास महामंडळ, सामाजिक वनीकरण विभाग व इतर सार्वजनिक व खाजगी स्त्रोतामधून ही वृक्ष लागवड करण्यात येईल.

ग्राम विकास विभाग

आदिवासी विकास विभाग

या सर्व कामांना पुरक म्हणून आदिवासी उप योजना अंतर्गत उपलब्ध होणारा निधी वापरण्यात येईल. पुरक योजनेचा वापर खालीलप्रमाणे नवीन योजना तयार करुन करण्यात येत आहे.

(अ) रोजगार हमी योजनेखाली घेतलेल्या वृक्ष लागवडीची देखभाल व पुढील विकास करण्यासाठी आदिवासी कुटूंब निहाय क्षेत्रावर संवर्धनाची जबाबदारी ठेवणे. त्या वृक्ष लागवडीची देखभाल करण्याकरिता ठराविक रक्कम प्रत्येक कुटूंबाला अनुदान म्हणून देण्यात येईल.

(ब) ज्या आदिवासी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे, त्या गावांमध्ये आदिवासी कुटूंबांना बायोगॅस ३/४ अनुदान तत्वावर देणे किंवा स्वयंपाकाचा गॅस ३/४ अनुदान तत्वावर देणे.

(क) शेतीसाठी सुधारित हत्यारे व संकरीत जनावरांसाठी चारा उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था पशुसंवर्धन विभागाने आदिवासी उप योजनेमधून आदिवासी कुटूंबासाठी तयार करीत आहे.

शिक्षण विभाग

राज्यात एकूण ९२,३९२ शाळा असून, प्रत्येक शाळेला जर १०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट दिले तर ९२ लक्ष वृक्षांची लागवड शिक्षण विभाग करु शकेल. याकरिता लागणाऱ्या रोपांचा पुरवठा सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटिका व मंजूर असलेली किसान रोपवाटिका यांच्याकडून उपलब्ध होवू शकेल. रोपांकरिता आगावू रक्कम त्वरित केल्यास, त्यांना हव्या असलेल्या रोपांची मागणी कायम करता येईल.

उद्योग विभाग व वन विभाग यांनी संयुक्तपणे त्रिपक्षीय योजनेंतर्गत करावयाची वृक्ष लागवड.

१६,१४० उद्योगधंद्यांची नोंदणी महाराष्ट्रात आहे. प्रत्येक उद्योगाने जर ५ हजार झाडांचे उद्दिष्ट गाठले तर ८ लाख ७० हजार वृक्ष लागवड करता येईल. हे उद्दिष्ट पूर्ण करीत असताना जिल्ह्याचे व्यवस्थापकीय संचालक, जिल्हा उद्योग केंद्र व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मुख्य वनसंरक्षक यांचेशी संपर्क साधून मोठ्या उद्योगांना सामाजिक जबाबदारी (Corporate Social Responsibility) या हेतूने उपलब्ध असलेल्या निकृष्ट दर्जाच्या वनांच्या जमिनीवर त्रिपक्षीय करार करुन वृक्ष लागवड करावयाचा शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. त्याचा आढावा जिल्हाधिकारी यांनी दरमहा वन विभाग, उद्योग विभाग यांच्या संयुक्त उपस्थितीत घेण्यात यावा.

सार्वजनिक बांधकाम विभाग.

महाराष्ट्रामध्ये २ लाख ४० हजार कि.मी. चे रस्ते असून, प्रत्येक कि.मी.ला १०० झाडे लावल्यास, २ कोटी ४० लाख वृक्ष लागवड करता येईल. महाराष्ट्र वन विकास महामंडळ, किसान रोपवाटिका आणि खाजगी

.....५/-

रोपवाटिका यामध्ये असलेली रोपे उपलब्ध करुन घ्यावीत. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी अधिक्षक अभियंता मंडळ निहाय २ कोटी ४० लाखांचे वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट वाटप करावे. या वृक्ष लागवडीचा अहवाल मुख्य सचिव यांच्या दरमहा आढावा बैठकीत सादर करण्यात यावा.

नगर विकास विभाग

राज्यामध्ये महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषदा एकूण २५१ आहेत. प्रत्येक नगर पालिकेला २ हजार आणि महानगर पालिकेला १० हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट दिल्यास, ४८ लाख इतकी वृक्ष लागवड होवू शकेल. नगर विकास विभागाने प्रत्येक महानगर पालिका / नगर पालिकानिहाय उद्दिष्ट निश्चित करावे.

जलसंपदा विभाग

सिंचन विभागाकडे उपलब्ध असलेली गाळपेराची जमीन, धरणाखाली भूसंपादन झालेली शिल्लक जमीन, कालवे आणि सिंचन विभागाच्या वसाहती येथेही वृक्ष लागवड करण्यास वाव आहे. या सर्व उपलब्ध क्षेत्राचा विचार करुन मुख्य अभियंता यांनी अधिक्षक अभियंता मंडळ निहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात यावे.

इतर विभाग.

याव्यतिरिक्त इतर विभागांनाही वृक्षारोपण करण्यास वाव आहे. यास्तव, संबंधित विभागाच्या सचिवांनी त्यांचे स्तरावर आढावा घेवून स्वत:हून उद्दिष्ट ठरवून तसे मुख्य सचिवांना कळविण्यात यावे.

कार्यक्रम आयोजन, संनियंत्रण व समग्र कार्यपध्दती.

शासन निर्णय, क्रमांक एफडीएम-२००५/प्र.क्र.१२५/फ-२, दिनांक २२ नोव्हेंबर,२००५ अन्वये राष्ट्रीय वन निती,१९९८ च्या धोरणानुसार गठीत करण्यात आलेल्या मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समिती या कार्यक्रमाचे संनियंत्रण करील. या समितीची बैठक दर पंधरा दिवसांनी घेण्यात येईल आणि त्यामध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे विभागवार उद्दिष्टांचा आढावा घेतला जाईल.

जिल्हा पातळीवर नियोजन.

जिल्हा पातळीवर सदर कार्यक्रमाचे नियोजन, निधीची उपलब्धता, येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरिता व उद्दिष्ट पूर्तीची जबाबदारी पार पाडण्याकारिता जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे समितीचे सह-अध्यक्ष असतील. या समितीमध्ये मुख्य वनसंरक्षक (वन विभागाचे मुख्यालय असल्यास, अन्यथा जेष्ठतम उप वनसंरक्षक), उप-संचालक (सामाजिक वनीकरण), व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अधिक्षक जिल्हा कृषी अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), अधिक्षक अभियंता (सार्वजनिक बांधकाम), अधिक्षक अभियंता (जलसंपदा विभाग), प्रकल्प अधिकारी (आदिवासी विकास विभाग) हे सदस्य असतील.

.....६/-

सदर समितीची बैठक दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी जिल्हाधिकारी घेतील. या बैठकीमध्ये विभागवार दिलेल्या उद्दिष्टांच्या आढावा, उद्दिष्ट पूर्ती करण्याकरिता रोपांच्या उपलब्धतेचा आढावा, रोपे पुरेशी उपलब्ध नसल्यास, स्थानिक नियोजन करुन प्रश्न सोडविण्याची कार्यवाही, रोजगार हमी योजनेमधून घेण्यात येणाऱ्या वृक्ष लागवडीची प्रशासकीय मान्यता वेळेवर मिळविणे व प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निधी उपलब्ध असल्याबाबतचा आढावा घेणे, मजूरांच्या मजूरीचे वाटप वेळेवर होते की नाही, याचीही तपासणी, इत्यादी बाबींचा आढावा घेतला जाईल.

सदरच्या समितीच्या कामाचे संनियंत्रण करण्याकारिता विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येत आहे. या समितीमध्ये अपर आयुक्त (आदिवासी विकास), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), सह-संचालक (उद्योग), उप-संचालक (शिक्षण) हे सदस्य राहतील. ही विभागीय समिती दर महिन्याला प्रत्येक जिल्ह्याचा जिल्हावार आढावा घेवून, तेथील दौरे आयोजित करुन, प्रत्यक्ष कामाची पाहणी करु शकेल.

राज्य पातळीवर एम.आय.एस. (Management Information System)

एम.आय.एस. (Management Information System) चे ऑन लाईन संगणकीकरण करण्यात आलेले आहे. त्यांचे मुख्यालय मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, ठाणे हे केंद्रबिंदू राहील. एम.आय.एस. ची माहिती संकलित करुन, संकलित माहितीप्रमाणे जिल्हावार विभाग व जिल्हा पातळीवर पुर्तता झाली किंवा नाही, याची माहिती नियंत्रण कक्ष, मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण यांच्या नियंत्रणाखाली राहणार आहे. यासाठी विकसित करण्यात आलेले सॉफ्टवेअर त्यांनी सर्व विभागांना उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. याआधारे दरमहा प्राप्त होणारा अहवाल सर्व विभागाचे सचिव, प्रधान सचिव आणि अपर मुख्य सचिव यांनी मुख्य सचिवांना यांना सादर करावयाचा आहे. प्रधान सचिव (जलसंधारण) यांचे नियंत्रणाखाली मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, ठाणे हे काम करतील.

( रत्नाकर गायकवाड )
मुख्य सचिव